**<u>स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)</u>**

**सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामाबाबत व त्या अनुषंगिक सुविधा पुरविण्याबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय, क्रमांक: स्वमअ-२०१८/प्र. क्र.८१/नवि-३४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

४ था मजला, मंत्रालय, मुंबई

दिनांक: २९ जानेवारी, २०१८.

**<u>पहा :</u>**

१. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४८/नवि-३४, दि. २० नोव्हेंबर, २०१५.

२. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४८/नवि-३४, दि. १ डिसेंबर, २०१६.

३. शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४८/नवि-३४, दि. १६ ऑगस्ट, २०१७.

**<u>परिपत्रक:</u>**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी दिनांक १५ मे, २०१५ पासून संपूर्ण राज्यात “मिशन मोड” पध्दतीने सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरे **“हागणदारी मुक्त”** करणे व घनकचरा व्यवस्थानातंर्गत **“स्वच्छ”** करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. या अभियानांतर्गत शहरे हागणदारी मुक्त करण्यासाठी उघड्यावर शौचास जाणाऱ्या नागरिकांना वैयक्तिक घरगुती शौचालय/सामुदायिक शौचालय/ सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शौचालयाच्या बांधकामामध्ये बाजारात उपलब्ध असलेल्या तयार प्लास्टीक (Prefabricated Plastic Material) साहित्याचा वापर करण्यात येवू नये, अशा सूचना संदर्भीय १ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच शहरात मलनिस्सारण सुविधा उपलब्ध असल्यास बांधण्यात येणारे शौचालय त्यास जोडण्यात यावे. मलनिस्सारण सुविधा उपलब्ध नसल्यास अथवा ती ३० मीटर पेक्षा अधिक लांब असल्यास बांधण्यात येणाऱ्या शौचालयाबाबत ही सविस्तर सुचना सदर शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

३. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शौचालय बांधकामासाठी प्री-कास्ट (Pre-Cast) साहित्याचा वापर करताना त्या साहित्याच्या दर्जा बाबत सविस्तर सुचना संदर्भीय २ येथील शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि शासनामार्फत सदर सूचना निर्गमित करण्यापूर्वी तसेच काही अपवादात्मक परिस्थितीत त्यानंतरही काही शहरांमध्ये प्री-कास्ट (Pre-Cast) सामुदायिक अथवा सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर बांधकाम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार व

शासनाच्या धोरणानुसार नाही. तसेच अशा प्रकारे बांधकाम करण्यात आलेल्या प्री-कास्ट (Pre-Cast) सामुदायिक अथवा सार्वजनिक शौचालयाची स्थिती चांगली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

४. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व त्या शहरांचा “हागणदारी मुक्त शहर” हा दर्जा कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने संबंधित शहरातील सामुदायिक अथवा सार्वजनिक शौचालयाची स्थिती चांगली व वापर करण्यायोग्य असणे गरजेचे आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, राज्यातील शहरांचा “हागणदारी मुक्त शहर” हा दर्जा कायम राखण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात.

- शहरातील उघड्यावर शौचास जाणाऱ्या १००% नागरिकांना वैयक्तिक घरगुती शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.
- काही अपवादात्मक परिस्थितीत वैयक्तिक घरगुती शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे शक्य नसल्यास चांगल्या स्थितीतील व वापर करण्यायोग्य सामुदायिक अथवा सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. सार्वजनिक व सामुदायीक शौचालयांसाठी कोणत्याही परिस्थितीत प्री-कास्ट (Pre-Cast) व शोष खड्ड्याच्या शौचालयांचा वापर करण्यात येवू नये.
- सामुदायिक अथवा सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देताना अशी शौचालये मैला संकलन प्रणालीस प्राधान्याने जोडण्यात यावीत. (सेप्टिक टँक अथवा भूयारी गटार यांना जोडणे आवश्यक आहे.)

५. राज्यातील शहरांमध्ये हागणदारी मुक्तीबाबत सातत्य राखण्यासाठी उपरोक्त प्रमाणे सार्वजनिक / सामुदायीक शौचालये उपलब्ध करून देताना संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस १४ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीचा वापर करता येईल.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२९१७०८०५८५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhakar Dnyandeo Bobade

Digitally signed by Sudhakar Dnyandeo Bobade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc1634ab95abe4652ec2433f0ccd505c20ea3e7ecad3bfcb55d49ad9dbd0fe5e, serialNumber=2e4705465b9bdfd5b38b2d36aae83659869796cb8cc2aefbc550989feec27db1, cn=Sudhakar Dnyandeo Bobade
Date: 2018.01.29 17:14:26 +05'30'

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२. मा .मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई

४. मा .राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व), मंत्रालय, मुंबई

५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६. विभागीय आयुक्त, महसूल विभाग (सर्व).
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
८. जिल्हाधिकारी, सर्व
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).
११. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१२. निवडनस्ती, नवि-३४.